# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**
**क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.१८८/२०२३/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.विठ्ठल बाबुराव काळे,<br>रा.२५६/१/१ जुना गुळवंच रोड, कानडे मळा,<br>मु.पो.ता.सिन्नर, जि.नाशिक. | तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर.<br>ता.सिन्नर, जि.नाशिक. |

**विवेचन**

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(८)(क) अन्वये तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी आदेश प्राप्तीच्या ३० दिवसांच्या आंत पथक गठीत करुन सदर माहितीचा पुन्हा एकदा शोध घेऊन, माहिती आढळ झाल्यास अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती आढळ न झाल्यास त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या कायद्यान्वये अभिलेख गहाळ प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेवर कार्यवाहीबाबत आवश्यक प्रस्ताव आदेश प्राप्तीच्या ३० दिवसांच्या आंत सक्षम प्राधिकारी यांना सादर करुन त्याची एक प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी."

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तहसिलदार, सिन्नर यांनी मला आजपावेतो सदरची माहिती दिलेली नाही अशी तक्रारदार यांनी दि.२२/०२/२०२३ अन्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने दि.१४/१२/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

(१)विद्यमान तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार अभिलेख गहाळ प्रकरणी जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करावी व त्याची एक प्रत तक्रारदारास उपलब्ध करुन द्यावी.

(२)आयोगाने द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर, जि.नाशिक यांनी पालन केले नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि.१५/०९/२०२२ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर, जि.नाशिक यांनी आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आंत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे याप्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर, जि.नाशिक यांनी आयोगाकडे कोणता लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. तथापि आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रीवरुन असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी सुनावणी घेवून पारित केलेले आदेश आयोगाच्या कार्यालयाकडून दि.०७/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदरचे आदेश तहसिल कार्यालय, सिन्नर यांच्याकडे दि.१६/०१/२०२३ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यानुसार तत्कालीन तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर यांनी दि.१८/०१/२०२३ च्या आदेशान्वये तीन कर्मचा-यांचे एक पथक गठीत केले होते. सदर पथकाने दि.०७/०२/२०२३ अन्वये जन माहिती

अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर यांना अहवाल सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदार श्री.विठ्ठल बाबुराव काळे, रा.सिन्नर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत स.नं.२५६/१/१ (२६०) यावर रे.ऑ.रा.ल. दाखल असलेली नोंद नं.१७५६० व मृत्यू दाखल्याच्या मूळ कागदपत्रांच्या नकला मिळणेबाबत माहिती मागितलेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीचा अभिलेख कक्ष, तहसिल कार्यालय, सिन्नर येथे कसून शोध घेतला असून, सदरची माहिती आढळ होत नसल्याने सदरची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देता येऊ शकत नाही. परंतू स.नं.२५६/१/१ (२६०) चे ७/१२ उतारे व नोंदी सोबत सादर करण्यात येत आहे (पानांक १ ते ९३)

४. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता आयोगाने द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८)(क) अन्वये तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्यानुसार सदर प्रकरणी तत्कालीन तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी सुनावणी घेवून पारित केलेल्या आदेशानुसार पथक गठीत करुन माहितीचा शोध घेतला. मात्र आयोगाच्या आदेशानुसार माहिती आढळ न झाल्यास सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ च्या कायद्यान्वये अभिलेख गहाळ प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कार्यवाही करण्याबाबतचा आवश्यक प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांच्याकडे पाठविल्याचे दिसून येत नाही. तसेच आयोगाने तक्रार क्र.१८८/२०२३/नाशिक संदर्भात दि.१४/१२/२०२३ रोजी सुनावणी घेवून पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर, जि.नाशिक यांनी कोणताही लेखी खुलासा आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे याप्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) आयोगाने द्वितीय अपिल क्र.२१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८)(क) अन्वये तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्यानुसार तत्कालीन तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर, जि.नाशिक (दि.१८/०१/२०२३ रोजी कार्यरत) यांनी आयोगाकडे कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नसल्याने उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या मते त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जिल्हाधिकारी, नाशिक यांनी तत्कालीन तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ता.सिन्नर, जि.नाशिक यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.१८८/२०२३/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक ता.जि.नाशिक.

जा.क्र. ८२९२ , दिनांक :- 08 DEC 2025